जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 MAR 2023 लोकमत

# जिल्ह्यात कौशल्याधारित अभ्यासक्रम सुरू करा

## शिवाजी विद्यापीठाकडे सूचना : गोखले कॉलेजमधील बैठकीत दोनशेहून अधिक प्रस्ताव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शेतकरी आत्महत्या थांबविण्याच्या दृष्टीने शेतीविषयक व कला, क्रीडा तसेच कौशल्याधारित अभ्यासक्रम जिल्ह्यात सुरू केले जावेत, अशा सूचना शिवाजी विद्यापीठाच्या बृहत आराखड्यासाठी बोलावलेल्या बैठकीत मांडण्यात आल्या.

विद्यापीठाच्या २०२४-२५ ते २०२८-२९ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी नवीन महाविद्यालये, विद्याशाखा, अभ्यासक्रमांची ठिकाणे निश्चित करून शास्त्रशुद्ध पद्धतीने नवीन पंचवार्षिक बृहत आराखडा बनवण्यासाठी मंगळवारी येथील गोपाळकृष्ण गोखले महाविद्यालयात झालेल्या बैठकीत आवश्यक त्या शैक्षणिक सुविधांसाठी सुमारे २०० हून अधिक संस्थांकडून सूचना मिळाल्या. अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या वाणिज्य व्यवस्थापन विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन होते.



शिवाजी विद्यापीठाच्या बृहत आराखडासंदर्भात मंगळवारी गोखले महाविद्यालयात झालेल्या बैठकीत स्वागत परुळेकर, मंजिरी देसाई, एस. एच. ठकार, एस. एस. महाजन, सिद्धार्थ शिंदे, प्रा. जयंत पाटील, के. एस. चौगुले, डॉ. विलास सोयम उपस्थित होते. (छाया : नसिर अत्तार)

शेती, शूटिंग रायफल प्रशिक्षण, शाहिरी, पोवाडे आदी लोककला, ग्राहक सेवा, बीएसडब्ल्यू, ग्रामीण भागात वाणिज्य कॉलेज, पशुधन, कौशल्याधारित अभ्यासक्रम, क्रीडा अधिविभाग, फाईन आर्टस, कला, क्रीडा, संगीत विशारद पूर्णकालिक अभ्यासक्रम, तसेच कृषी आणि अर्थविषयक अभ्यासक्रमांच्या सूचना या बैठकीत आल्या.

शिवाजीराव परुळेकर, रमेश मोरे, शाहीर आझाद नायकवडी, संदीप जंगम, एन. डी. चौगुले, विजयसिंह पाटील, प्राचार्य धनाजी मोरजकर, संभाजी ब्रिगेडचे नीलेश सुतार, प्रफुल्ल मांगोरे, मधुकर पाटील, अधिसभा सदस्य अभिषेक मिठारी, श्वेता परुळेकर, विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, सामाजिक संस्थांनी सूचना नोंदवल्या. ही माहिती बृहत आराखड्यात समाविष्ट केली जाणार आहे.

डॉ. मंजिरी देसाई मोरे यांनी स्वागत केले. उपकुलसचिव डॉ. विलास सोयम यांनी प्रास्तविक केले. व्यवस्थापन समितीचे सदस्य सिद्धार्थ शिंदे आणि डॉ. महाजन यांनी मार्गदर्शन केले. डॉ. एस. एच. ठकार यांनी आभार मानले.

22 MAR 2023 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठाच्या बृहत आराखड्यासाठी आयोजित बैठकीत २०० सूचना

# क्रीडा महाविद्यालय सुरू करा

कोल्हापूर, ता. २१ : कला-क्रीडानगरी असलेल्या कोल्हापुरात स्वतंत्र ललितकला महाविद्यालय, क्रीडा महाविद्यालय सुरू करावे. परदेशी भाषांचे पदवीपर्यंत शिक्षण मिळावे. प्रत्येक महाविद्यालयांमध्ये सांस्कृतिक समन्वयक नेमण्यात यावा, अशा विविध सुमारे २०० सूचना आज विद्यार्थी, सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी शिवाजी विद्यापीठाला केल्या.




कोल्हापूर : बैठकीस मंजिरी मोरे, एस. एच. ठकार, एस. एस. महाजन, सिद्धार्थ शिंदे, व्ही. एम. पाटील, विलास सोयम उपस्थित होते.

विद्यापीठ पंचवार्षिक (सन २०२४-२५ ते २०२८-२९) बृहत आराखडा तयार करणार आहे. त्याबाबत सूचना जाणून घेण्यासाठी बृहत आराखडा समितीने गोखले कॉलेजमध्ये बैठक घेतली. अध्यक्षस्थानी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन होते. कोल्हापूर कलानगरी आहे. मात्र, फिल्म ड्रामा, फाईन आर्ट, विविध स्पोर्टस्, आदींचा अभ्यास करण्यासाठी येथील विद्यार्थ्यांना दिल्ली, मुंबई, पुणे येथे जावे लागते. त्यांच्यासाठी आणि कोल्हापूरची कला, क्रीडा परंपरा जोपासण्यासाठी फिल्म, ड्रामा, फाईन आर्टस अँड स्पोर्टस् यांच्यासाठी स्वतंत्र महाविद्यालय सुरू करण्याची सूचना अभिषेक मिठारी यांनी केली. 'क्रीडाविषयक आहार, मेडिटेशन अभ्यासक्रम, परदेशी भाषेचे पदवीपर्यंत शिक्षण द्यावे. बी. व्होकमधील प्रिंटिंग अँड पब्लिकेशनचे लहान अभ्यासक्रम सुरू करावेत', अशी सूचना श्वेता परुळेकर यांनी केली. प्रत्येक महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग समन्वयकांची नेमणूक करावी. सांस्कृतिक अभ्यासक्रम सुरू करण्याची सूचना आझाद नायकवडी यांनी केली. कमी पैशात शेती करण्याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठीचे काही अभ्यासक्रम सुरू करण्याची सूचना शिवाजीराव परुळेकर यांनी केली. या बैठकीत संदीप जंगम, एन. डी. चौगुले, विजयसिंह पाटील, नीलेश सुतार, प्रफुल्ल मांगोरे आदींनी विविध सूचना केल्या. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, स्वागत परुळेकर आदी उपस्थित होते. डॉ. मंजिरी देसाई-मोरे यांनी स्वागत केले. उपकुलसचिव डॉ. विलास सोयम यांनी प्रास्तविक केले. डॉ. एस. एच. ठकार यांनी आभार मानले.

### शासनाचा हस्तक्षेप नको

बृहत आराखड्याद्वारे नवे अभ्यासक्रम, महाविद्यालय, शैक्षणिक सुविधा सुरू करण्याबाबत सूचना जाणून घेतल्या जातात. मात्र, काही संस्थाचालक थेट शासनाला प्रस्ताव सादर करतात. त्यांना महाविद्यालय, अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी दिली जाते. त्याद्वारे होणारा शासनाने हस्तक्षेप करू नये, अशी आग्रही मागणी बैठकीत करण्यात आली.

22 MAR 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ बृहत आराखड्यासाठी दोनशेवर प्रस्ताव

## जिल्ह्यातील विविध घटकांची गोखले कॉलेजमध्ये बैठक : नव्या सूचनांचा आराखड्यात समावेश करणार : डॉ. एस. एस. महाजन यांची माहिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने कृषी अन् बिगर कृषी विद्यापीठांना एकत्रित आणण्यासाठी पुढाकार घेतला. नव्या शैक्षणिक धोरणाचे आव्हान समोर असताना व्यावसायिक आणि शैक्षणिक संस्थांनी एकत्रितपणे त्याला सामोरे जावे. आवश्यक त्या सुचनांचा नव्या बृहत आराखड्यात निश्चितच समावेश केला जाईल, अशी ग्वाही विद्यापीठातील वाणिज्य व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन यांनी दिली. दरम्यान, या बैठकीत जिल्ह्यातून सव्वादोनशेवर प्रस्ताव, सुचना आल्याची माहिती उपकुलसचिव व्ही. एस. सोयम यांनी दिली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या नियोजित बृहत आराखड्यासाठी मंगळवारी गोपाळकृष्ण गोखले कॉलेजमध्ये बैठक झाली. बैठकीत बोलताना डॉ. एस. एस. महाजन. शेजारी डॉ. एस. एच. ठकार, डॉ. मंजिरी मोरे देसाई, डॉ. विलास सोयम आदी.**

शिवाजी विद्यापीठाच्या नियोजित पंचवार्षिक बृहत आराखड्यासाठी मंगळवारी येथील गोपालकृष्ण गोखले कॉलेजमध्ये अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी ते बोलत होते. बैठकीला विद्यापीठातील विज्ञान, तंत्रज्ञान शाखेच्या प्रभारी अधिष्ठाता डॉ. एस. एच. ठकार, अधिसभा सदस्या डॉ. मंजिरी मोरे देसाई, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, उपकुलसचिव डॉ. विलास सोयम यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्व. एम. आर. देसाई, स्व. बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

डॉ. महाजन म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणाच्या नियोजित आराखड्यावर प्रभाव राहणार आहे. शिवाजी विद्यापीठ लोकाभिमुख आहे. आंतरराष्टीय स्तरावर रँकींगमध्येही ते आघाडीवर आहे. आता कृषी आणि बिगर कृषी विद्यापीठांनी समन्वयातून एकत्रित वाटचाल करणे आवश्यक बनले आहे. त्यासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पुढाकार घेतला आहे. राज्य शासनानेही निधीसाठी सकारात्मकता दर्शवली आहे. त्यामुळे आपल्याकडून आलेल्या सुचना, प्रस्तावांचा बृहत आराखड्यात समावेश केला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत शिवाजीराव परूळेकर यांनी शेतकरी आत्महत्याशी निगडीत प्रश्नांचा अभ्यास करून शेतीविषयक स्वतंत्र तुकडी करावी, असे सांगितले. रमेश मोरे यांनी क्रीडा विभागात परिपूर्ण सुविधा देण्याची मागणी केली. शाहीर आझाद नायकवडी यांनी विद्यापीठात लोककला अधिविभाग सुरू करावा, अशी मागणी केली. संदीप जंगम, सुहास गुरव यांनी ग्राहक सेवा अभ्यासक्रम सुरू करण्याची सुचना केली. एन. डी. चौगुले यांनी विद्यार्थी संस्था वाढवण्याची सुचना केली. जयसिंह पाटील यांनी कौशल्यावर आधारीत पशुधन अभ्यासक्रमाची सुचना केली.

ॲड. अभिषेक मिठारी यांनी फिल्म, फाईन आर्ट अभ्यासक्रम सुरू करण्याची सुचना केली. अभिजित मिठारी यांनी क्रीडा अधिविभाग, संगीत विभागात नवीन शैक्षणिक धोरणाचा समावेश करण्याची सुचना मांडली. धनाजी मोरस्कर, नरेंद्र जाधव, प्रफुल्ल मांगिरे, श्वेता परूळेकर यांनी कला, क्रीडा महाविद्यालय, भाषा विभाग, आहारशास्त्र, पदविका अभ्यासक्रम सुरू करण्याची सुचना केली. मधुकर पाटील यांनी कृषी अभ्यासक्रमाविषयी सुचना केली. डॉ. दीपक गावडे यांनी रिसर्च उपकरणे विद्यार्थ्यांसाठी खुली करावीत, अशी सुचना मांडली.

डॉ. आर. बी. भुयेकर यांनी स्वागत केले. स्वागत परूळेकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. झावरे, प्रा. बिसुरे यांनी सुत्रसंचालन केले. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव जयकुमार देसाई, पेटन कौन्सील सदस्य दौलत देसाई, विद्यापीठ अधिसभा सदस्य, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, संस्था प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी, प्राचार्य, शिक्षक उपस्थित होते. दरम्यान, बृहत आराखड्याच्या प्रस्ताव, सुचनांसाठी महाविद्यालय प्रागणांत चार टेबल मांडले होते. तेथे प्रस्ताव देण्यासाठी गर्दी होती. दुपारपर्यंत सव्वादोनशेच्यावर प्रस्ताव आल्याची माहिती डॉ. सोयम यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
22 MAR 2023 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुंबई आणि पुणे विद्यापीठांत उद्या अंतिम लढत

## राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी ‘कुलगुरू चषक टी-२०’ क्रिकेट स्पर्धा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी ‘कुलगुरू चषक टी-२०’ क्रिकेट स्पर्धेत झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यांत मुंबई विद्यापीठ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांनी अनुक्रमे नांदेड आणि शिवाजी विद्यापीठ यांचा पराभव करीत अंतिम फेरीत प्रवेश केला. बुधवारी या दोन संघांमध्ये विजेतेपदासाठी, तर नांदेड व शिवाजी विद्यापीठात तिसऱ्या क्रमांकासाठी लढत होईल.

उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात मुंबई विद्यापीठाने नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा १६ धावांनी पराभव केला. मुंबईने २० षटकांत ७ बाद १४९ धावा केल्या. नांदेडचा संघ २० षटकांत ८ बाद १३३ धावांत आटोपला. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यात सामना झाला. अत्यंत चुरशीने खेळल्या गेलेल्या या रोमहर्षक सामन्यात शिवाजी विद्यापीठाला पुण्याकडून अवघ्या ३ धावांनी पराभव स्वीकारावा लागला.पुणे विद्यापीठाने २० षटकांत ९ गड्यांच्या मोबदल्यात १३७ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठाचा संघ २० षटकांत ७ बाद १३४ धावांपर्यंत मजल मारू शकला.

बुधवारी तिसऱ्या क्रमांकासाठी शिवाजी विद्यापीठ आणि नांदेड विद्यापीठ यांच्यात सामना होईल, तर दुपारी मुंबई आणि पुणे विद्यापीठांत अंतिम सामना होईल.

लोकमत

# 'विवेकानंद'मध्ये शनिवारी चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये राज्यशास्त्र विभागातर्फे शनिवारी (दि. २५) 'लोकशाही : काल, आज आणि उद्या' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र होत आहे. या चर्चासत्रात राजकीय विश्लेषक प्रा.डॉ. प्रकाश पवार 'भारतीय लोकशाही आणि आयडिया ऑफ इंडिया' या विषयावर बीजभाषण करणार आहेत. 'लोकमत'चे संपादक डॉ. वसंत भोसले 'प्रसारमाध्यमे आणि लोकशाही' यावर मार्गदर्शन करतील. यशदा, पुणेचे मानद व्याख्याते भारत पाटील हे 'स्थानिक स्वराज्य संस्था आणि भारतीय लोकशाही' यावर प्रकाश टाकतील.

कोल्हापूर जिल्ह्यातील सामाजिक संशोधन क्षेत्रातील विद्यार्थी, प्राध्यापक व अभ्यासकांनी या चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी व संशोधन निबंध सादर करण्यासाठी समीक्षा फराकटे आणि दत्ता जाधव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले आहे.

22 MAR 2023
जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सॉफ्टबॉल स्पर्धेत विद्यापीठाचा संघ द्वितीय

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : चंदिगड येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला सॉफ्टबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने साखळी सामन्यात कालिकत युनिव्हर्सिटीचा ४-२ असा आणि दिल्ली विद्यापीठाचा तब्बल १७-१ असा पराभव करून स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला.

मानांकनाच्या सामन्यात कुरुक्षेत्र विद्यापीठाविरुद्ध शिवाजी विद्यापीठाने ४-२ असा विजय मिळवून साखळी फेरीत प्रवेश केला होता. मंगळवारी कालिकत विद्यापीठाचा १- ४ असा पराभव करून दोन गुणांची कमाई केली आणि दुसऱ्याच सामन्यात दिल्ली विद्यापीठाला १७-१ असे हरवले. तिसऱ्या सामन्यात मात्र एक शून्य असा पराभव पत्करावा लागला. स्वप्नाली वायदंडे हिच्या पिचिंगपुढे एकाही खेळाडूंचा निभाव लागला नाही. तिला कॅचर ऐश्वर्या पुरीने साथ दिली. करिष्मा कुडचे, पल्लवी कांबळे, साक्षी लगाडे, सुजाता थोरवडे, सृष्टी कदम, वेदश्री पाटील यांनीही फलंदाजीमध्ये चांगली साथ दिली.

लोकमत

# मुंबई, पुणे विद्यापीठात आज अंतिम लढत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत मंगळवारी झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात मुंबई विद्यापीठ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांनी अनुक्रमे नांदेड आणि शिवाजी विद्यापीठ यांचा पराभव करीत अंतिम फेरीत प्रवेश केला. आज, या दोन संघांमध्ये विजेतपदासाठी, तर नांदेड व शिवाजी विद्यापीठात तिसऱ्या क्रमांकासाठी लढत होईल. उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात मुंबई विद्यापीठाने नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा १६ धावांनी पराभव केला. दुसऱ्या सामन्यात पुणे विद्यापीठानने शिवाजी विद्यापीठाला ३ धावांनी पराभूत केले.

पुढारी

# आंतरराष्ट्रीय परिसंवादासाठी डॉ. लंगरे यांना निमंत्रण

कोल्हापूर : अमेरिकेतील जेम्स मेडिसिन विद्यापीठातील महात्मा गांधी अभ्यास केंद्राच्या वतीने २७ व २८ सप्टेंबर रोजी प्रा. टेरी बाईटझल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित 'बाईटझल २०२३' परिसंवादासाठी शिवाजी विद्यापीठातील सहयोगी प्रा. डॉ. चंद्रकांत लंगरे यांना निमंत्रित केले आहे. ते महात्मा गांधी ऑन सेल्युलॉईड या विषयावर विचार मांडणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 MAR 2023
सकाळ

# राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ द्वितीय

**कोल्हापूर, ता. २१ :** चंदीगड येथे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला सॉफ्टबॉल स्पर्धा झाली. त्यात शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने साखळी सामन्यात कालिकत युनिव्हर्सिटीचा ४-२ असा, तर दिल्ली विद्यापीठाचा तब्बल १७-१ असा पराभव करून द्वितीय क्रमांक मिळविला.

सोमवारी (ता. २०) झालेल्या मानांकनाच्या सामन्यात कुरुक्षेत्र विद्यापीठाविरुद्ध शिवाजी विद्यापीठाने ४ - २ असा विजय मिळवून अंतिम चार संघात स्थान मिळवत साखळी फेरीत प्रवेश केला. आज पहिल्या साखळी सामन्यात कालिकत विद्यापीठाचा



**कोल्हापूर : चंदीगड येथे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला सॉफ्टबॉल स्पर्धा झाली. त्यात शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने साखळी सामन्यात कालिकत युनिव्हर्सिटीचा ४-२ असा, तर दिल्ली विद्यापीठाचा तब्बल १७-१ असा पराभव करून द्वितीय क्रमांक मिळविला.**

१-४ असा पराभव करून दोन गुणांची कमाई केली. दुसऱ्या सामन्यात दिल्ली विद्यापीठाला तब्बल १७ - १ असे हरवले. दरम्यान, शिवाजी विद्यापीठाच्या यशात आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वप्नाली वायदंडे हिने जोरदार पिचिंग केले. तिच्या पिचिंगपुढे संपूर्ण भारतातून आलेल्या एकाही खेळाडूचा निभाव लागला नाही. तिला कॅचर ऐश्वर्या पुरी हिने अचूक साथ दिली. त्याचबरोबर करिष्मा कुडचे, पल्लवी कांबळे, साक्षी लगाडे, सुजाता थोरवडे, सृष्टी कदम, वेदश्री पाटील यांनी फलंदाजीमध्ये चांगली साथ दिली. दरम्यान, या राष्ट्रीय स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सुरुवातीपासून दमदार कामगिरी केली. मात्र, पंचांच्या चुकीच्या निर्णयाचा फटका संघाला बसल्याचे संघ व्यवस्थापक डॉ. बाबासाहेब उलपे यांनी सांगितले.

**विद्यापीठाचा संघ असा**

विद्यापीठाच्या संघात स्वप्नाली वायदंडे (कर्णधार), ऐश्वर्या पुरी, करिष्मा कुडचे, पल्लवी कांबळे, सानिका संकपाळ, गौरी माळी, आलिशा कांबळे, सृष्टी कदम, निरुपमा कांबळे, वेदश्री पाटील, साक्षी लगाडे, सुजाता थोरवडे, निकिता जाधव, दीक्षा शिंदे, शितल जाधव, राधिका कळंत्रे, प्रशिक्षक सुशांत कायपुरे, संघ व्यवस्थापक डॉ. बाबासो उलपे यांचा समावेश आहे. या संघाला कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.

22 MAR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : कुलगुरू चषक टी-२० स्पर्धेतील शिवाजी विद्यापीठ आणि पुणे विद्यापीठ यांच्यात रंगलेल्या उपांत्य फेरीतील सामन्यात गोलंदाज विश्वनाथ वरुटे याने पुण्याच्या फलंदाजास बाद केले तो क्षण.

# कुलगुरू चषक टी-२० साठी आज 'मुंबई-पुणे' भिडणार

## तृतीय क्रमांकासाठी शिवाजी विद्यापीठ लढणार

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठात राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा सुरू आहे. त्यात आज झालेल्या उपांत्य फेरीतील सामन्यांत मुंबई विद्यापीठ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांनी अनुक्रमे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि शिवाजी विद्यापीठ यांचा पराभव करीत अंतिम फेरीत प्रवेश केला. या दोन्ही संघांमध्ये उद्या (ता. २२) विजेतेपदासाठी, तर नांदेड आणि शिवाजी विद्यापीठात तिसऱ्या क्रमांकासाठी लढत होणार आहे.

आज उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात मुंबई विद्यापीठाने नांदेडच्या संघाचा १६ धावांनी पराभव केला. मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ७ बाद १४९ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना नांदेड संघ २० षटकांत ८ बाद १३३ धावांच करू शकला. त्यांच्याकडून नरशी कागडा यांनी १९ धावा केल्या. मुंबईच्या संजय भालेराव आणि प्रवीण मुळम यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले. मुंबईकडून १४ धावा आणि ३ बळी घेणारे प्रवीण मुळम 'सामनावीर' ठरले. उपांत्य फेरीचा दुसरा सामना शिवाजी विद्यापीठ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यात झाला. अत्यंत चुरशीने खेळल्या गेलेल्या या रोमहर्षक सामन्यात शिवाजी विद्यापीठाला पुण्याकडून अवघ्या ३ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. पुणे विद्यापीठाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ९ गड्यांच्या मोबदल्यात १३७ धावा केल्या. पुण्याच्या मनीष गायकवाड यांनी ५३ धावांची अर्धशतकी खेळी केली, तर नितीन प्रसाद यांनी ३६ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठाच्या सिद्धार्थ लोखंडे यांनी ३२ धावांत ४ बळी, तर अजय आयरेकर यांनी ३१ धावांत २ बळी घेतले. विनायक शिंदे आणि विश्वनाथ वरुटे यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. प्रत्युत्तरादाखल खेळताना शिवाजी विद्यापीठाचा संघ २० षटकांत ७ बाद १३४ धावांपर्यंतच मजल मारू शकला. यामध्ये विनायक शिंदे यांच्या ४१ तर विशाल हिलगे यांच्या ३० धावांचा समावेश आहे. पुण्याच्या सुनील मते, विनोद नरके यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. पुण्याकडून अर्धशतकी खेळीसह १ बळी घेणारे मनीष गायकवाड 'सामनावीर' ठरले.

तरूण भारत

# मुंबई-फुले विद्यापीठात आज अंतिम लढत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्यआंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या अजिंक्यपदासाठी बुधवार २२ रोजी मुंबई विद्यापीठ व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यात अंतिम सामना होत आहे. या सामन्याला दुपारी २ वाजता प्रारंभ होईल. या सामन्यापूर्वी तिसऱ्या क्रमांकासाठी शिवाजी विद्यापीठ व नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्यात सामना होईल. मंगळवारी झालेल्या उपांत्य फेरीतील सामन्यांत मुंबई विद्यापीठ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रतिस्पर्धी संघांना हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीतील पराभवामुळे शिवाजी विद्यापीठाचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आहे. शिवाजी विद्यापीठाने या स्पर्धेचे आयोजन केले आहे.